I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 421-423
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# कोव्हीड– हया विषाणूमुळे निर्माण झालेल्या महामारीत महिलांच्या आर्थीक व्यवहारात प्लास्टिक मनी कार्ड व डिजिटल बँकिंगचा सहभाग

श्वेता गुंडावार व डॉ. उषा खंडाळे

सहाय्यक प्राध्यापक
गृह अर्थशास्त्र विभाग
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर
Corresponding Author : gundawarshweta@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 01.04.2022

**संदर्भ :**
नोटबंदीनंतर डिजिटल व्यवहाराला चालना मिळेल असे सरकारला वाटत होते ती चालना नोटबंदीच्या चार वर्षानंतर मिळायला सुरवात झाली, कोरोनाचे संकट आले व शक्य तितका लोकांशी संपर्क टाळण्याची आवश्यकता निर्माण झाली व त्यासाठीच बऱ्याच लोकांनी दररोज लागणाऱ्या वस्तूंचे पेमेंट डिजिटल व्यवहारातून करण्यास सुरवात केली. या डिजिटल व्यवहारासाठी प्लास्टिक मनी कार्ड जसे, क्रेडिट, डेबिट, एटीएम कार्ड याशिवाय वेगवेगळ्या बँकांचे युपीआय, पेटीएम, गुगल पे, फोन पे यासारख्या डिजिटल माध्यमांचा वापर महिलांकडूनही काही प्रमाणात केल्या जात आहे. महिलांमध्ये प्लास्टिक मनी कार्डच्या वापराविषयीची भीती कमी करून प्लास्टिक कार्ड विषयीची जागरुकता वाढविल्यास प्लास्टिक कार्डच्या वापरात महिला पुढे येतील व सरकारच्या डिजिटल व्यवहाराच्या योजनेला गती मिळेल.

**बिजशब्द** – एनईएफटी , आरटीजीएस , युपीआय, भीम, प्लास्टिक मनी कार्ड, डिजिटल व्यवहार इत्यादी.

**प्रस्तावना:**
डिसेंबर २०१९ मध्ये चीनमधील वूहान शहरात कोरोना व्हायरस आढळून आला व त्याला कोव्हीड–१९ असे नाव देण्यात आले. सुरवातीला हा विषाणू वूहान शहराच्या आजूबाजूला पसरला होता. परंतु त्याची तीव्रता जास्त असल्याने मृत्युदर वाढला होता. हळूहळू हा विषाणू जगभर पसरला. हा विषाणू श्वसन मार्गाद्वारे शरीरात प्रवेश करीत होता व संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तीला कोरोन हा विकार होत होता. त्यामुळे संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात इतर व्यक्तींना येवू न देणे आवश्यक झाले होते.

या विषाणूंचा उद्‌भवन काळ १४† दिवसांचा असल्याने

संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या व्यक्तीच्या शरीरात १४ दिवसांपर्यंत केव्हाही लक्षणे दिसून येत होती व याच काळात ती व्यक्ती इतरांच्या संपर्कात आल्यास त्याही व्यक्ती कोरोन बाधित होत असल्याचे लक्षात आले व संक्रमण वाढतच होते. हे वाढते संक्रमण थांबविण्यासाठी चीन सरकारने सर्व व्यवहार थांबवून म्हणजेच घरातून कोणी बाहेर जाणार नाही व घरात कोणी येणार नाही यासाठी १५ दिवसांचा लॉकडाऊन जाहिर केला व ह्याचा बऱ्यापैकी फायदा दिसून आला होता. आणि चीनमधील विषाणूचे संक्रमण कमी कमी होत गेले. हे पाहूनच जगातील सर्व देशांनी आपापल्या देशात तेथील परिस्थितीनुसार लॉकडाऊन जाहीर केला.

भारतात सुद्धा अशा प्रकारचा लॉकडाऊन पहिल्या लाटेच्या वेळी दीड ते दोन महिने तर, दुसऱ्या लाटेच्या वेळी दोन ते अडीच महिने होता. कोरोनाचा विषाणू कोरोना संक्रमित व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या वस्तूंच्या माध्यमातून संक्रमित होत होता. लॉकडाऊन नंतरही ह्या विषाणूपासून सुरक्षित राहण्यासाठी सरकारने कामाच्या, दुकानांच्या, भाजी बाजाराच्या वेळांवर नियंत्रण ठेवले, परंतु वेळांवर नियंत्रण तर होते, घरातून व्यक्ती कामानिमित्यच बाहेर पडत होते तरी सुद्धा विषाणूचे संक्रमण सुरूच होते. त्यासाठी सॅनीटायझर वापरल्या जात होते, व्यक्ती व्यक्ती पासून सुरक्षित अंतर राखल्या जात होते, मुख आच्छदनाचा वापर केल्या जात होता. तरी सुद्धा वस्तू, भाज्या, फळे इत्यादींची खरेदी करताना पैशाची देवाण–घेवाण ही होतच होती. ह्या रोख रकमेच्या माध्यमातूनही कोव्हीड–१९ चे संक्रमण होण्याची शक्यता ही होतीच. शिवाय घरातून बाहेर निघणे घातक ठरू शकत होते. म्हणून अशावेळी रोख व्यवहाराला पर्याय म्हणून ऑनलाईन खरेदीचा पर्याय निवडणे लोकांना जास्त फायद्याचे होते आणि त्यासाठी डिजिटल व्यवहार करावा लागतो.

अशा या डिजिटल व्यवहारासाठी प्लास्टिक मनी कार्ड जसे, क्रेडिट, डेबिट, एटीएम कार्ड याशिवाय वेगवेगळ्या

I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 421-423
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

बँकांचे युपीआय, पेटीएम, गुगल पे, फोन पे यासारख्या डिजिटल माध्यमांचा वापर केल्या जातो. भारत सरकारने आर्थिक व्यवहार जास्त पारदर्शक व्हावेत या दृ ष्टीने डिजिटल व्यवहारांना प्राधान्य दिले व त्यासाठी सरकारने स्वतःच्या भीम (भारत इंटरफेस मनी ) ची निर्मिती केली. सुरवातीला या द्वारे होणाऱ्या व्यवहारांवर काही बक्षिसे पण देण्यात येत होती. सरकारने डिजिटल व्यवहारांना दिलेल्या प्राधान्यामुळे आणि कोव्हीड–१९ च्या संक्रमणाच्या भीतीमुळे कोरोनाच्या काळात पूर्वीपेक्षा जास्त डिजिटल व्यवहारांची संख्या वाढली.

कोरोना विरुद्धचा लढा यशस्वी करण्यासाठी घरात राहून सामाजिक अंतर पाळणे आवश्यक होते व आजही आहे. पण अर्थव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी आर्थिक व्यवहार सुरु ठेवणे आवश्यक आहे. हे आर्थिक व्यवहार पुढील माध्यमांच्या सहाय्याने सुरु ठेवणे शक्य आहे व त्याचे फायदे पण आहेत.

१) एटीएम कार्ड च्या द्वारे एटीएम मधून पैसे काढणे व टाकणे हे बँकेच्या गर्दीत न जाता शक्य आहे.

२) पैशाचे हस्तांतरण करण्यासाठी नेट बँकिंग करण्यासाठी एनईएफटी (नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर) आरटीजीएस (रियल टाईम ग्रॉस सेटलमेंट) यापैकी कोणत्याही सुविधांचा आपण वापर करू शकतो.

३) बँक खाते नंबर, बँकेचा आयएफएससी कोड, आणी युपीआय यांच्या आधारे मोबाईल वरून भीम, पेटीएम, गुगल पे, फोन पे या द्वारे, पैशाचे हस्तांतरण, मोबाईल बिल, फोन बिल, विजेचे व पाण्याचे बिल, क्रेडिट कार्डचे बिल यासारखे आर्थिक व्यवहार घरबसल्या सहज करता येतात.

४) शिवाय, असे व्यवहार केल्यावर कधी–कधी कॅश बॅक ऑफर, क्रेडीट कार्डच्या च्या माध्यमातून क्रेडीट पॉइट जमा होतात. तसेच ऑनलाईन वस्तूंवर सवलत पण प्राप्त होत असतो.

५) डिजिटल व्यवहार नेहमी सुरु असतात आणि हे व्यवहार जिथे नेट सुरु आहे अशा कुठल्याही जागेवरून केव्हाही करता येतात.

**साहित्याचे अवलोकन :**

"कोव्हीड–१९ हया साथीच्या रोगाचे संक्रमण टाळण्यासाठी लोकांनी रोख रकमेऐवजी डिजिटल पेमेंटचा पर्याय निवडला आहे. साथीच्या काळात चलनी नोटा वापरण्याची लोकांमधील भीती ही किती वाढली होती हे जून २०२० मध्ये डिजिटल पेमेंटच्या वाढलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. पूर्वी ऑनलाईन रेशन खरेदी केल्या जात नव्हते, ते या काळात सुरु झाले व त्यासाठी डिजिटल पेमेंटचा वापर जनता करायला लागली २०१६ˆ च्या नोटबंदी नंतर डिजिटल व्यवहार वाढतील असे वाटले पण याच दरम्यान चलनी नोटांची उपलब्धता वाढल्याने सरकारचे स्वप्न अपूर्ण राहिले परंतु, गेल्या तिन महिन्यात डिजिटल व्यवहार वाढले आहेत. कोव्हीड–१९ चा धोका कक्षात घेता, लोकं डिजिटल व्यवहाराला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे डिजिटल पेमेंट दुप्पट झाले आहे. ." (पोलीसनामा, २०२०)

**उद्दिष्टे :**

१) महिलांमधील प्लास्टिक मनी कार्ड विषयीची जागरुकता जाणून घेणे


२) कोव्हीड–१९ च्या संक्रमण काळात महिलांद्वारे वस्तूंची खरेदी व पैशांचे हस्तांतारणाच्या पद्धतीत झालेला बदल जाणून घेणे.

**गृहीत कृत्ये :**

१) कोव्हीड–१९ च्या संक्रमण काळात महिलांमध्ये प्लास्टिक मनी कार्ड विषयीची जागरुकता वाढली आहे.

२) कोव्हीड–१९ च्या संक्रमण काळापासून महिलांच्या आर्थीक व्यवहाराच्या पद्धतीत बदल झाला आहे.

| खरेदी | पूर्वीची पद्धत | सध्याची पद्धत |
|---|---|---|
| खरेदीचे ठिकाण | ऑफलाईन दुकान | ऑनलाईन व ऑफलाईन दुकान |
| खरेदीची पद्धत | रोख व्यवहार व कमी प्रमाणात कार्ड पेमेंट | कार्ड पेमेंट व रोख व्यवहार |




कोरोना पूर्वी व कोरोनाच्या दरम्यान महिलांकडून झालेला प्लास्टिक मनी कार्डचा वापर

**निष्कर्ष :**

चंद्रपूर शहरातील २५ महिलांचा अभ्यास केला असता असे निदर्शनास आले की, कोरोनापुर्वी ज्या महिला आर्थिक व्यवहारासाठी काही प्रमाणात प्लास्टिक मनी कार्ड व डिजिटल बँकिंगचा उपयोग करीत होत्या त्यांच्याकडून

कोरोनाच्या काळात हा वापर वाढलेला आहे. ज्या महिला कोरोनापुर्वी प्लास्टिक मनी कार्डचा वापर फक्त एटीएम मधून पैसे काढण्यासाठीच करीत होत्या त्यांनी सुद्धा कोरोनाच्या काळापासून काही प्रमाणात प्लास्टिक मनी कार्डचा वापर वाढविला आहे. पण, त्यांच्याकडून हा वापर कपड्यांच्या ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही खरेदीसाठी व पैशाच्या हस्तांतरणासाठी वाढला आहे. कोरोना संक्रमणाच्या पूर्वीपेक्षा नंतरच्या काळातइक मनी कार्ड विषयी जागरुकता वाढली आहे. परंतु ही जागरुकता पैशाचे हस्तांतरण करण्यासाठी झालेली दिसून येत आहे. अजूनही किराणा, भाज्या, फळे व बँकांच्या आर्थिक व्यवहारात तितक्या प्रमाणात वाढ व जागरुकता दिसून आली नाही. महिलांमध्ये प्लास्टिक मनी कार्डच्या वापराविषयीची भीती कमी करून प्लास्टिक कार्ड विषयीची जागरुकता वाढविल्यास प्लास्टिक कार्डच्या वापरात महिला पुढे येतील व सरकारच्या डिजिटल व्यवहाराच्या योजनेला गती मिळेल.

**संदर्भ :**

प्रगत गृह व्यवस्थापन , क्षमा लिमये व आशा निमकर
https://policenama.com
https://www.paisabajar.com>rtgs
https://www.icicibank.com>neft